| | |
|---|---|
| MHSO170028342025 | **नियमित दि.दावा क्रं. ५६३/२०२५**<br>**बापू वि. भिमाबाई व इतर** |

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन –**

२) मौजे रोपळे(कव्हे), ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट क्र. ४०/२ मधील ०४ हे ६३ आर मिळकत ज्याची चतुःसिमा पुर्वेस सुतार यांची जमीन, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस साळवी यांची जमीन व उत्तरेस गट नं. ४०/३ अशी आहे. (सदर मिळकत दाव्याचा व प्रस्तुत अर्जाचा विषय असल्याने यापुढे सोईसाठी सदर मिळकतीस "दावा मिळकत" असे संबोधले आहे.)

३) वादीचे थोडक्यात कथन की, दावा मिळकत वादीची वडिलोपार्जित मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीबाबत वादीने त्यांचे वडील नामे बजरंग भिवा माळी, आई नामे जानकाबाई व इतर यांचेविरुध्द माढा येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर या न्यायालयात रे.मु. नं. ९०५/२०२२ हा दावा सरस निरस मानाने वाटप करुन मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दि. ३१/०७/२०२४ रोजी झाला व सदर दाव्यामध्ये वादीचा दावा मिळकतीत १/७ हिस्सा न्यायालयाने घोषित केलेला आहे. सदर दावा वादीचे वडील यांचेविरुध्द विना लेखीकैफियत निकाली झाला.

४) वादीचे पुढील कथन की, सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाविरुध्द वादीचे वडिलांनी जिल्हा न्यायालय, बार्शी येथे दिवाणी अपील नं. ९५/२०२४ दाखल केले. सदर अपिल प्रलंबित असताना वादीचे वडील नामे बजरंग भिवा माळी हे दि. २२/०५/२०२५ रोजी मयत झाले. त्यांचे मृत्यूनंतर वादी दावा मिळकतीस वारस नोंद

करणेकरिता अर्ज देणेस गेले असता त्यांना गावकामगार तलाठी यांनी फेरफार नं. ७२५० ही नोंद दावा मिळकतीच्या संदर्भात पुर्वीच मृत्यूपत्रावरुन घेण्यात आली आहे असे सांगितले. त्यानंतर वादीने फेरफार नं. ७२५० हा दि. २५/०७/२०२५ रोजी काढून पाहिला असता वादीचे वडील मयत बजरंग भिवा माळी यांनी दावा मिळकतीचे संदर्भात प्रतिवादी क्र. १ व २ यांचे नावे दि. १४/०९/२०१८ रोजी मृत्यूपत्र करुन ठेवले होते व त्याचा अंमल त्यांचे मृत्यूनंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केल्याचे वादीस समजले.

५) वादीचे पुढील कथन की, वादीचे वडील मयत बजरंग भिवा माळी यांनी दाखल केलेल्या रे.मु.नं. ९०५/२०२२ या दाव्यात हजर झाले होते. सदर दाव्यातील न्यायनिर्णयाविरुध्द त्यांनी बार्शी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले. परंतु, त्यांनी सदर मृत्यूपत्राबाबत दाव्यात व अपिलात कथन केलेले नाही. वादीचे वडिलांना वडिलार्जित मिळकतीचे एकटया संपूर्ण क्षेत्राचे मृत्यूपत्र करण्याचा कोणताही हक्क, हितसंबंध नाही. वादीचा दावा मिळकतीत १/७ हिस्सा रे.मु.नं. ९०५/२०२२ या दाव्याच्या निकालात निश्चित केला आहे. त्यामुळे, सदर मृत्यूपत्राचे अस्तीत्व संपुष्टात आले आहे. तसेच, सदरचे मृत्यूपत्र बेकायदेशीर होत आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा सदर दि. १४/०९/२०१८ रोजीचे मृत्यूपत्र बेकायदेशीर व रद्दबातल असून वादीचे हक्कावर मुळीच बंधनकारक नाही असे ठरवून जाहिर होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

६) वादीचे पुढील कथन की, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे नाव दि. १४/०९/२०१८ रोजीचे मृत्यूपत्राआधारे दावा मिळकतीचा फेरफार उतारा व सातबारा उतारा यावर नोंदवण्यात आले आहे. सदर नोंदीच्या आधारे प्रतिवादी दावा मिळकत बेकायदेशीररित्या हस्तांतरित करण्याच्या प्रयत्नात आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकत विक्री केल्यास वादीचा हक्क संपुष्टात येईल व वादीचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे, वादीने प्रतिवादींनी दावा प्रलंबित असताना दावा मिळकत इतर कोणास विक्री, हस्तांतरित करु नये तसेच दावा मिळकतीत त्रयस्त व्यक्तीचा हक्क, हितसंबंध निर्माण करु नये असा निरंतर ताकिदीचा अनुतोष मिळावा अशी विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

७) प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. १९ व २१ अन्वये लेखी कैफियत व

म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतला आहे. प्रतिवादींनी वादीचे कथन नाकारले आहे. प्रतिवादींनी, दावा मिळकतीच्या चतुःसिमा वादीने चुकीच्या नमूद केल्या आहेत. वादीने दाव्यात मृत्यूपत्रात नमूद जानकाबाई बजरंग वाघमारे यांना दाव्यात आवश्यक पक्षकार केलेले नाही. त्यामुळे दाव्यास आवश्यक पक्षकाराची बाधा येत आहे. तसेच, वादीचा दावा व प्रस्तुत अर्ज कायदेशीर नाही. वादीला दावा दाखल करण्यास कुठलेही कारण घडले नाही असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

८) वादीने अर्जातील कथनाच्या पुष्टयर्थ नि.क्र. ०४ वरील यादीसोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, फेरफार क्र. ७२५० नोंदीची उतारा प्रत, रे.मु.नं. ९०५/२०२२ या दाव्याच्या निकालाची प्रत, दस्त क्र. ४४९९/२०१८ अन्वये असलेले मृत्यूपत्र, बजरंग भिवा माळी यांचे मृत्यू प्रमाणपत्र, दिवाणी अपील क्र. ९५/२०२४ चा अपील मेमो अशी कागदपत्रे अभिलेखावर सादर केली आहेत.

९) प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व दाखल कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह त्याखाली नमुद केलेले आहेत.

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने असे सिद्ध केले आहे काय की, प्रथमदर्शनी दावा वादीच्या बाजुने आहे ? | होय |
| २) | वादीच्या बाजुने नैसर्गिक न्यायाचा समतोल आहे काय ? | होय |
| ३) | अर्ज मंजुर केला नाही तर वादीचे कधीही न भरुन येणारे अतोनात नुकसान होईल, हे वादीने सिद्ध केले आहे काय ? | होय |
| ४) | काय आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

१०) वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांनी अर्जातील कथन व त्यांचे म्हणणे यातील कथनाप्रमाणे

युक्तीवाद केला.

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ –**

११) प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द वादीच्या वडिलांनी प्रतिवादींच्या हक्कात दावा मिळकतीचे करुन दिलेले मृत्यूपत्र बेकायदेशीर व रद्दबातल ठरवून वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असे घोषित होवून मिळणेकामी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी दावा मिळकत इतर कोणास विक्री, हस्तांतरित करु नये, दावा मिळकतीवर कर्ज काढू नये व दावा मिळकतीत ति–हाईत इसमाचा हक्क, हितसंबंध निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप विचारात घेता कायदयातील स्थित्य तत्वानुसार, वादीस प्रथमतः दावा मिळकतीत वादीचा हिस्सा असून प्रथमदर्शनी दावा व कायद्याचा समतोल वादीच्या बाजूने आहे. तसेच, अर्ज नामंजूर केल्यास वादीचे जास्त नुकसान होणार आहे हे सिध्द करणे आवश्यक आहे.

१२) वादीने दावा मिळकत वडिलार्जित मालकी वहिवाटीची आहे व दावा मिळकतीत वादीचा १/७ हिस्सा आहे असे कथन केले आहे. तसेच, वादीचे वडिलांनी दि. १४/०९/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांचे हक्कात दावा मिळकतीबाबत बेकायदेशीर मृत्यूपत्र केले आहे असे कथन केले आहे. सदरचे कथन प्रतिवादींनी नाकारले आहे. वादीने कथनापुष्टयर्थ दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र. ९०५/२०२२ या प्रकरणामधील न्यायनिर्णयाची प्रत, दि. १४/०९/२०१८ रोजीचे मृत्यूपत्र, अपील मेमो, वादीचे वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र, दावा मिळकतीचा फेरफार उतारा व सातबारा उतारा या कागदपत्रांचे अवलोकन केले.

१३) वादीचे वडील नामे बजरंग भिवा माळी यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांचे हक्कात दावा मिळकतीबाबत दि. १४/०९/२०१८ रोजी नोंदणीकृत मृत्यूपत्र केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीने त्यांचे वडील व इतरांविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेबाबत दि. १०/१०/२०२२ रोजी दिवाणी न्यायालय, माढा येथे दिवाणी दावा क्र. ९०५/२०२२ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्यात वादीचे वडील हजर झाले होते परंतु त्यांनी लेखी कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे

त्यांचेविरुध्द दावा विना लेखीकैफियत चालवण्यात आला असे सदर न्यायनिर्णयात नमूद असल्याचे दिसून येते. सदर दाव्याचा निकाल दि. ३१/०७/२०२४ रोजी पारित झाला असून सदर न्यायनिर्णयाआधारे वादीचा दावा मिळकतीत १/७ हिस्सा असल्याचे न्यायालयाने घोषित केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१४) सदर न्यायनिर्णयाविरुध्द वादीचे वडिलांनी दिवाणी अपील क्र. ९५/२०२४ दि. ०४/०९/२०२४ रोजी बार्शी येथील जिल्हा न्यायालयात दाखल केले असून सदर अपील प्रलंबित असल्याचे दिसून येते. सदर अपील मेमोचे अवलोकन केले असता वादीचे वडिलांनी सदर मृत्यूपत्राबाबत अपील मेमोमध्ये उल्लेख केला नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यानंतर, दि. २२/०५/२०२५ रोजी वादीचे वडील मयत झाले आहेत असे मृत्यू प्रमाणपत्रावरुन दिसून येते. वादीचे वडिलांनी वादीने त्यांचेविरुध्द दावा मिळकतीचे वाटपाबाबत दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र. ९०५/२०२२ या दाव्यात हजर होवून सुध्दा सदर वादातील मृत्यूपत्राबाबत न्यायालयात लेखी कैफियत दाखल करुन त्याबाबत माहिती का दिली नाही, तसेच, अपील मेमोमध्ये सदर वादातील मृत्यूपत्राबाबत उल्लेख का केला नाही ही बाब गुणदोषाचा भाग असून वादी व प्रतिवादींनी पुरावा सादर केल्यानंतर विचारात घेतले जाऊ शकते.

१५) सदरचे वादातील दि. १४/०९/२०१८ रोजीचे मृत्यूपत्र नोंदणीकृत असले तरी वादीने दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र. ९०५/२०२२ यामधील न्यायनिर्णयामध्ये न्यायालयाने दावा मिळकत वादीची वडिलार्जित मिळकत असल्याचे व वादीचा दावा मिळकत १/७ हिस्सा असल्याचे घोषित केले आहे. सदर न्यायनिर्णय वादीच्या हक्कात असल्याने वादीचा दावा मिळकतीत १/७ हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर न्यायनिर्णयाविरुध्द केलेल्या अपिलामध्ये सदर न्यायनिर्णयास स्थगिती आहे किंवा कसे याबाबत प्रतिवादींनी ऊहापोह केला नाही. सदर न्यायनिर्णयास जिल्हा न्यायालयाने अद्याप स्थगिती दिली नसल्याचे अभिलेखावरील कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, प्रथमदर्शनी दावा व कायद्याचा समतोल वादीचे बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१६) वादीने दाखल केलेल्या दावा मिळकतीचा सातबारा उतारा व फेरफार

उतारा याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे नावाची नोंद सदर वादातील मृत्यूपत्राआधारे सदर सातबारा उतारा व फेरफार उतारा यावर झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकत विक्री, हस्तांतरित करण्याची व दावा मिळकतीत ति–हाईत इसमाचा हक्क, हितसंबंध निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झाले तर प्रथमदर्शनी दावा वादीच्या हक्कात असल्याने वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, प्रथमदर्शनी दावा, कायद्याचा समतोल वादीच्या बाजूने तसेच, अर्ज नामंजूर केल्यास वादीचेच नुकसान होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येतो.

**मुद्दा क्रमांक ४–**

१७) मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदविल्यामुळे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश–

**आदेश**

| | |
|---|---|
| १) | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २) | प्रतिवादी क्र.१ व २ यांनी स्वतः अथवा इतर कोणाही मार्फत प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकत इतर कोणासही विक्री अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करु नये तसेच दावा मिळकतीमध्ये ति–हाईत इसमाचा हक्क, हितसंबंध निर्माण करु नये असे आदेशीत करण्यात येते. |
| ३) | अर्जाचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी आपआपला सोसावा. |

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.04.15 17:59:28 +0530

दिनांक – १५/०४/२०२६

(**अनय ज्ञा. कुलकर्णी**)
३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 15/04/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 15/04/2026 |